पुढारी

# विद्यापीठ परीक्षा शासन निर्देशाप्रमाणेच होणार

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालकांचे परिपत्रक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिलमध्ये घेण्यात येणाऱ्या सर्व मौखिक, प्रात्यक्षिक व लेखी परीक्षांच्या तारखा शासन निर्देशानुसार जाहीर करण्यात येतील. सर्व परीक्षांच्या नियोजनाबाबतचा तपशील व स्वतंत्र वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, अधिविभागांना सोमवारी काढले आहे.

विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२० मधील उन्हाळी सत्रातील परीक्षा प्रारंभ तारखा संबंधितांना कळविण्यात आल्या होत्या. राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व मौखिक, प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा १४ एप्रिलपर्यंत स्थगित करण्यात आल्या आहेत. परीक्षा प्रारंभ तारखाबाबतचे परिपत्रक रद्द करण्यात आले आहे.


तथापि, विद्यापीठाच्या परीक्षांसंदर्भात विविध प्रसार माध्यमांतून बातम्या प्रसारित होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होत आहे. ही संभ्रमावस्था टाळण्यासाठी उन्हाळी सत्रातील परीक्षेसंदर्भात कार्यवाही निश्चित करण्यासाठी शासनस्तरावर सहासदस्यीय उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या निर्देशानुसार परीक्षेबाबतची पुढील कार्यवाही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

# हवा प्रदूषण ५० टक्क्यांनी घटले

## शहर घेतेय मोकळा श्वास; विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागाची पाहणी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १३ : लॉकडाउनच्या कालावधीत शहरातील हवेचे प्रदूषण ५० टक्क्यांनी घटले आहे. प्रदूषणातून सल्फर डायऑक्साईडचे ४०, नायट्रोजन डायऑक्साईड २५, तर अतिसूक्ष्म धूलिकणांचे ५० टक्क्यांनी प्रमाण कमी झाले. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाने केलेल्या पाहणीत हा निष्कर्ष नोंदविला आहे. विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी ही माहिती दिली.



दाभोळकर कॉर्नर, महाद्वार रोड, शिवाजी विद्यापीठ परिसरातील हवेतील प्रदूषकांच्या प्रमाणांचे निरीक्षण केले. लॉकडाउनपूर्वी अर्थात १६ ते २२ मार्च, तर लॉकडाउनमधील ६ ते १२ एप्रिल कालावधीतील प्रदूषकांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साईड व सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण मोजण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावर हवेच्या गुणवत्तेचे मानांकन २४ तासांत केलेल्या पाहणीनुसार निश्चित केले आहे. त्यानुसार सल्फर डायऑक्साईड व नायट्रोजन डायऑक्साईड प्रत्येकी ८०, तर सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण १०० म्युजीपर मीटर क्यूबइतके आहे. पाहणीत विभागाचे चेतन भोसले, अजय गौड, अमित माने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळाचे उपविभागीय अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी सहभाग घेतला.

| **दाभोळकर कॉर्नर** (म्युजीपर मीटर क्यूबमध्ये) | | | |
|---|---|---|---|
| कालावधी | सल्फर डायऑक्साईड | नायट्रोजन डायऑक्साईड | सूक्ष्म धूलिकण |
| १६ ते २२ मार्च | २६.१९ | ४५.१५ | १२८.४८ |
| ६ ते १२ एप्रिल | १८.४५ | ३०.८२ | ७४.४७ |
| महाद्वार रोड | | | |
| १६ ते २२ मार्च | २०.५९ | ३७.५१ | ९८.९६ |
| ६ ते १२ एप्रिल | १३.६१ | २५.५४ | ५३.८२ |
| शिवाजी विद्यापीठ | | | |
| १६ ते २२ मार्च | १२.१५ | १७.५४ | ५७.९९ |
| ६ ते १२ एप्रिल | ७.१३ | १२.७२ | ४२.३६ |

# विद्यापीठे, महाविद्यालयीन स्तरावरील कोणतीही परीक्षा रद्द नाही – उदय सामंत

**। मुंबई :** राज्यातील विद्यापीठे आणि त्याअंतर्गत घेण्यात येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमधील कोणतीही परीक्षा रद्द केलेली नाही, मात्र या परीक्षेच्या संदर्भात ज्या सोशल माध्यमांवर अफवा पसरवल्या जात आहेत, त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी केले



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणारा दहावीच्या भूगोलचा पेपर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर रद्द करण्यात आला आहे. नववी आणि अकरावीच्या परीक्षाही रद्द करण्यात आल्या. त्याच पार्श्वभूमीवर विविध सोशल माध्यमांत विद्यापीठे आणि महाविद्यालय स्तरावरील परीक्षा रद्द झाल्याच्या अफवा पसरवल्या जात आहेत. त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये मोठे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याची दखल उच्च व तंत्रशिक्षण मंत्री सामंत यांनी घेतली. कोणती परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावरील सर्व परीक्षा घेण्यासाठी उच्च व माध्यमिक शिक्षण विभागाने ४ कुलगुरू आणि दोन संचालकांची समिती नेमली आहे. या परीक्षा कशा घ्यायच्या यासंदर्भात ही समिती उपाययोजना करणार आहे. त्यानंतर राज्यपाल याविषयी अंतिम निर्णय घेणार आहेत. त्यानंतरच यासंदर्भातील माहिती विभागाकडून पालक व विद्यार्थ्यांना देण्यात येईल. त्यामुळे तूर्तास परीक्षा रद्द करण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

राज्यात कोरोनाचे संकट अद्यापही कमी झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे भविष्यात जर आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाली, तर त्यामध्ये विद्यापीठे व महाविद्यालय स्तरावरील परीक्षा कशा घ्याव्यात, याबद्दल विचार होऊ शकतो. त्यासाठी काही 'ऑनलाइन' पर्याय देता येतील का, यासाठीचा 'फॉरमॅट' अद्याप संबंधित विभागाकडे बनला नसला तरी त्यावर भविष्यात विचार करता येऊ शकेल, असेही सामंत म्हणाले.

पुढारी

प्रासंगिक

# डॉ. आंबेडकर आणि 'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्याचा मागोवा घेतल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू दिसून येतात. लोकसंपर्क हा त्यांच्या नेतृत्वाचा अत्यंत महत्त्वाचा आयाम. विविध क्षेत्रांतील अनेक व्यक्ती त्यांच्या संपर्कात होते. कोल्हापुरातील अनेक मंडळी बाबासाहेबांच्या स्नेहबंधात बांधले गेले होते. त्यात राजर्षी शाहू महाराज, छ. राजाराम महाराज, 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव, दत्तोबा पोवार, गंगाराम कांबळे, तुकाराम आप्पाजी गणेशाचार्य, दत्तोबा दळवी, 'गरुड'कार दा. म. शिर्के इत्यादींचा समावेश होतो. आज बाबासाहेबांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या अनेक कार्यांत 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव (आबा) हे हिरिरीने सहभागी झाल्याच्या आठवणींना उजाळा देत आहोत.

मुंबई शहरातील अनेक कार्यक्रमांत आणि चळवळीत 'पुढारी'कार ग. गो. जाधव बाबासाहेबांच्या सोबत अग्रभागी राहिल्याच्या अनेक नोंदी आपल्याला पाहावयास मिळतात. तेथील कामगार चळवळी, समतेचे आणि परिवर्तनाचे लढे यामध्ये बाबासाहेबांच्या सोबत ते क्रियाशील राहिले होते. महाराष्ट्रातील एक विचारवंत श्री. रा. ना. चव्हाण आपल्या एका लेखात लिहितात, गणपतरावांनी (ग. गो. जाधव) डॉ. आंबेडकर यांच्या समवेत अनेक चळवळींत भाग घेतला. नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहात डॉ. आंबेडकर यांच्या बरोबरीने ते सहभागी झाले होते.

अनेक दलित चळवळींशी ग. गो. जाधव यांचा निकटचा संबंध आला होता. अस्पृश्यांना मंदिरांमध्ये प्रवेश मिळाल्याने त्यांचा उद्धार होतो, असे मानण्याचे कारण नाही. कारण, मंदिरांच्या गाभाऱ्यांत उभे राहण्यात धन्यता मानणारे अनेक महाभाग नर्मदेच्या गोट्यासारखे गुळगुळीत, थंडगार शिळेसारखे कोरडे पडलेले पाहिले तर, मंदिरात प्रवेश करणारेसुद्धा अर्धे अस्पृश्यच होते, असे 'पुढारी'कार सांगत असत.

तेव्हा मंदिराच्या उंबऱ्याबाहेर उभे असलेले अस्पृश्यच मानायला हवेत. कारण, दोघांनाही गाभाऱ्यात प्रवेश मिळत नसे. समाजामध्ये भेदाभेद मानून तो जिवंत आणि ज्वलंत ठेवून स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यात दरी निर्माण करण्याचे काम समाजातला एक विशिष्ट वर्ग सातत्याने करीत आला आहे. ही विषमतेची, भेदभावाची दरी मुजवून टाकून समाज एकसंध राखण्याच्या राष्ट्रीय कार्यात बाबासाहेबांना सतत साथ देऊन 'पुढारी'कार त्यांचा पाठपुरावा करीत असत.

'पत्रकारितेचा प्रेरणादायी वारसा' या आपल्या लेखात रा. ना. चव्हाण म्हणतात, डॉ. आंबेडकर व गणपतराव (जाधव) अनेक वेळा एकत्र आले होते. अस्पृश्यांच्या फेडरेशनच्या विद्यमाने रविवार, दि. ५ सप्टेंबर १९४३ रोजी दादर येथे डॉ. आंबेडकरांच्या सन्मानार्थ एक सभा भरली. गणपतराव जाधव या सभेचे अध्यक्ष होते. या सभेचा वृत्तान्त 'नवा काळ' वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला होता.

गणपतरावांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात बाबासाहेब काय बोलले, हेही उपलब्ध आहे. ते म्हणाले, मात्र एक गोष्ट लक्षात ठेवणे जरूर आहे की, सवलती आज मिळतात. कारण अस्पृश्य समाज लुळा-पांगळा आहे म्हणून; पण त्याने आपल्या पायांवर उभे राहण्यास शिकावे. केवळ गुणांवर, लायकीवरच वर चढण्याची उमेद बाळगावी. हा पराक्रम केला तर अस्पृश्यवर्गीय ब्राह्मणांच्या बरोबरीने दर्जा प्राप्त करून बसतील, अशी मला खात्री वाटते.

आंबेडकरांच्या सामाजिक, व्यापक दृष्टिकोनाचे खरे दर्शन 'पुढारी'कारांच्या कार्यात दिसते. या संदर्भात त्यांचा काही अग्रलेखांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. वानगीदाखल काही उदाहरणे देता येतात. ती अशी : १) हा म्हणे अस्पृश्योद्धार (१९ मार्च १९४३), २) अस्पृश्यता गेलीच पाहिजे (२२ एप्रिल १९४५), ३) जातीभेद नष्ट कसा होणार? (२९ मे १९४८), ४) नवबौद्धांना सवलती (६ जून १९५७) - हे अग्रलेख वाचताना डॉ. आंबेडकर आणि 'पुढारी'कार यांचे वैचारिक नाते स्पष्ट होते.

- **प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन**, संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# शहरातील हवा प्रदूषण पातळी ५० टक्क्यांनी घटली

## लॉकडाऊनचा परिणाम; शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागाच्या पाहणी अहवालातील निष्कर्ष

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या लॉकडाऊन कालावधीत शहरातील हवा प्रदूषणाची पातळी सुमारे ५० टक्क्यांनी घटली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाने केलेल्या पाहणी अहवालातून हा निष्कर्ष पुढे आला आहे.

कोरोना विषाणूचा संसर्ग वाढू नये, यासाठी राज्यात लॉकडाऊन घोषित करण्यात आला आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी प्रशांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, फिल्ड असिस्टंट अजय गौड, पर्यावरणशास्त्र विभागाचे अमित माने यांनी १६ ते २२ मार्च व ६ ते १२ एप्रिल या काळात शहरातील विविध ठिकाणचे हवा प्रदूषकांचे मापन केले. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांनुसार सल्फर डायऑक्साईडचे प्रमाण २४ तासांत ८० टक्के (मायक्रो ग्रॅम घनमीटर), नायट्रोजन डायऑक्साईड (८०) व अतिसूक्ष्म धूलिकण (१००) टक्के प्रमाण असणे आवश्यक आहे. पेट्रोलियम पदार्थांचे ज्वलन कमी झाल्याने सल्फर डायऑक्साईडचे प्रमाण मार्च महिन्यातील लॉकडाऊन सरासरीपेक्षा ४० टक्क्यांनी कमी झाले आहे. केमिकल्सचा वापर व इंडस्ट्री बंद असल्याने नायट्रोजन डायऑक्साईडचे प्रमाण २५ टक्क्यांनी कमी झाले आहे. वाहनांमधून निघणारा धूर, रस्त्यावरील धूळ, बेकरी, उद्योगांमधील धूर कमी झाल्याने अतिसूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण ५० टक्क्यांनी कमी झाल्याचे दिसून आले आहे.

> विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने शहरातील हवा प्रदूषणाचे मापन करण्यात आले. यात हवा प्रदूषण पातळीत घट झाली आहे. येणाऱ्या काळात असेच वातावरण ठेवणे शक्य झाल्यास १७ प्रदूषित शहरांच्या यादीतून लवकरच बाहेर पडू.
>
> **- डॉ. पी. डी. राऊत,**
> विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र अधिविभाग

**लॉकडाऊन कालावधीतील हवेतील प्रदूषकांचे प्रमाण...**

| ठिकाण | महिना | सल्फर डायऑक्साईड | नायट्रोजन डायऑक्साईड | सूक्ष्म धूलिकण |
|---|---|---|---|---|
| दाभोळकर कॉ. | १६ ते २२ मार्च | २६.१९ | ४५.१५ | १२८.४७ |
| | ६ ते १२ एप्रिल | १८.४५ | ३०.८२ | ७४.६५ |
| महाद्वार रोड | १६ ते २२ मार्च | २०.५९ | ३७.५१ | ९८.९६ |
| | ६ ते १२ एप्रिल | १३.६१ | २५.५४ | ५३.८२ |
| शिवाजी विद्यापीठ | १६ ते २२ मार्च | १२.१५ | १७.५४ | ५७.९९ |
| | ६ ते १२ एप्रिल | ७.१३ | १२.७२ | ४२.३६ |

पुढारी

# ट्विटर परिषदेमुळे संशोधकांना 'वर्क फ्रॉम होम'ची संधी : कुलगुरू डॉ. शिंदे

## 'नॅनो बायो २०' विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे ऑनलाईन उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ट्विटर परिषदेमुळे जगभरातील संशोधकांना 'वर्क फ्रॉम होम'ची उत्तम संधी प्राप्त झाली आहे. त्याचा सर्वांनी पुरेपूर उपयोग करून घ्यावा, असे प्रतिपादन कुलगुरू देवानंद शिंदे यांनी केले.

न्यू कॉलेज कोल्हापूर, दादा पाटील महाविद्यालय कर्जत व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नॅनो बायो २०' विषयावरील भारतातील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या ऑनलाईन उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. ही परिषद तीन दिवस सुरू राहणार आहे.

परिषदेमध्ये नॅनो तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान व करोना विषाणूला नियंत्रित करण्याच्या विषयावर पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण करण्यास सुरुवात झाली आहे. यात कोरिया, सिंगापूर, तैवान, इंग्लड, जर्मनी यासह भारतातील नामांकित विद्यापीठ आणि शिक्षण संस्थांतून तज्ज्ञ ४१० पेक्षा अधिक तज्ज्ञ अभ्यासक सहभागी झाले आहेत. प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी शुभेच्छा संदेश दिले. परिषदेचे नियोजन प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. नीलेश पवार आदींनी केले.



**कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

पुढारी

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा होणार ग्रंथरूपी जागर

## विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर संशोधन, विकास केंद्राचा उपक्रम

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्यावर संशोधनाचे कार्य शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे केले जात आहे. हे संशोधन समाजापर्यंत पोहचावे यासाठी ग्रंथ प्रकाशन प्रकल्प केंद्राने हाती घेतला आहे. यानिमित्ताने डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा जागर केला जाणार आहे.

केंद्रामार्फत यापूर्वी डॉ. ज. रा. दाभोळे यांनी लिहलेले 'प्रतित्यसमुत्पाद' हे भगवान बुद्धांच्या कारणकार्य भाव सिद्धांतावर आधारलेले पुस्तक प्रकाशित झाले आहे. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेने या पुस्तकाला ग्रंथ पुरस्कार प्रदान करून त्याच्या गुणवत्तेला दाद दिली आहे. येणाऱ्या काळात वेगळ्या विषयावरील ग्रंथ प्रकाशित करण्यात येणार आहेत. स्वातंत्र्य चळवळीतील डॉ.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष**



आंबेडकरांची भूमिका समजावून घेण्यासाठी प्रा. दत्ता भगत यांचे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. बाबासाहेबांचे सामाजिक परिवर्तनासंबंधात बौद्धिक योगदान यावर डॉ. डी. टी. खाबडे यांच्या पुस्तकातून कळणार आहे.

'स्त्रिया' नेहमी समाजाकडून दुर्लक्षित राहिलेल्या आहेत, परंतु बाबासाहेबांनी स्त्रियांच्या गुलामगिरीविरुद्ध नेहमीच लढा दिला आहे. त्याही काळात त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक स्त्रिया चळवळीत कार्य करीत होत्या. याचे योग्य आकलन

> डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, विचार समाजासमोर व्यापकदृष्टीने आणण्यासाठी ग्रंथरुपात प्रकाशित केली जाणार आहेत. यातून बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे बहुपैलू सर्वांना समजणार आहेत. त्यांच्या मानवतेच्या व्यापक लढ्याची व्याप्ती समजून येणार आहे.
>
> **- डॉ. श्रीकृष्ण महाजन,**
> संचालक, डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ

होण्यासाठी डॉ. दीपा श्रावस्ती यांचे पुस्तक महत्त्वाचे ठरणार आहे. सौंदर्यशास्त्राचे वेगळे दृष्टिकोन प्रा. सुधाकर गायकवाड यांचे 'दलित सौंदर्यशास्त्र' हे पुस्तक मराठीत मैलाचा दगड म्हणून ओळखले जाईल.

# ट्विटर परिषदेमुळे वर्क फ्रॉम होमची संधी

## उदघाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे यांचे प्रतिपादन



म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



डॉ. देवानंद शिंदे

'नॅनो- बायो २०' विषयावरील भारतातील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेमुळे जगभरातील संशोधकांना वर्क फ्रॉम होमची उत्तम संधी प्राप्त झाली आहे आणि त्याचा सर्वांनी पुरेपूर उपयोग करून घ्यावा,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले,

न्यू कॉलेज कोल्हापूर, कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'नॅनो बायो २०' विषयावरील परिषदेच्या ऑनलाइन उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. ही परिषद पुढील तीन दिवस सुरू राहणार आहे .

करोनाच्या पार्शवभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र सरकारच्या वर्क फ्रॉम होम आवाहनाला प्रतिसाद म्हणून या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये नॅनो तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान आणि करोनाला नियंत्रित करण्याच्या विषयावर पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण करण्यास सुरवात झाली. परिषद ऑनलाइन असल्याने प्रत्यक्ष भेटीसाठी ऐवजी घरात बसून जगभरातून सुमारे ४१० हून अधिक तज्ज्ञ अभ्यासक सहभागी झाले असून १७० पोस्टर्सचे सादरीकरण करण्यात आले.

लॉकडाउन काळात भारतात चालू असलेली ही एकमेव परिषद आहे. या परिषदेमध्ये आतापर्यंत कोरिया, सिंगापूर, तैवान, इंग्लड, जर्मनी यासह भारतातील नामांकित विद्यापीठ आणि शिक्षण संस्थांतून तज्ज्ञ सहभागी झाले आहेत.

परिषदेच्या उदघाटनप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु मा. डी. टी. शिर्के आणि विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी ऑनलाईन मनोगत व्यक्त केले.

या परिषदेचे नियोजन न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, डॉ. मानसिंगराज निंबाळकर, डॉ.अशोक चौगले, डॉ. संदीप पै आणि डॉ. निलेश पवार यांनी केले.

**मटा अँकर** शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागातर्फे प्रमुख ठिकाणचा पाहणी अहवाल

# कोल्हापूरची हवा 'रेडझोन' मुक्त

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

आरोग्याला घातक ठरणारे हवेतील धूलिकण, वाहनांच्या धुरामुळे दूषित बनलेली हवा, कारखान्यांच्या धुराड्यांमधून हवेत मिसळणारा धोकादायक वायू यामुळे देशातील १७ प्रदूषित शहरांच्या यादीत कोल्हापूरचा समावेश झाला होता. तथापि लॉकडाउनच्या काळात करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे कोल्हापूरची हवा कमालीची सुधारल्याचे स्पष्ट झाले असून, शहराची वाटचाल आता ग्रीन झोनच्या दिशेने होत आहे. प्रदूषणाचा टक्का २५ टक्क्यांपर्यंत खाली आल्याने कोल्हापूरची हवा पर्यावरणदृष्ट्या 'रेडझोन' मुक्त झाली आहे.

लॉकडाउनच्या काळात शहरातील हवा प्रदूषणाचे मापन शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने केले. त्यात हवेतील सल्फर डायऑक्साइड (एसओटू), नायट्रोजन डायऑक्साइड (एनओटू), सूक्ष्म धूलीकणांच्या प्रमाणात (आरएसपीएम) कमालीची घट झाल्याचे दिसून आले.

संचारबंदी लागू होण्यापूर्वीचा १६ ते २२ मार्चदरम्यानचे शहरातील हवा प्रदूषणाचे प्रमाण आणि ६ ते १२ एप्रिल या काळातील पाहणी अंतर्गत आलेल्या आकडेवारीची तुलना केल्यानंतर हवा प्रदूषणात कमालीची घट झाली आहे.

एप्रिलमधील मापनात एसओटूचे प्रमाण मार्चमधील संचारबंदीच्या काळातील सरासरीपेक्षा ४० टक्क्यांनी कमी झाले आहे. एनओटूचे प्रमाण २५ टक्क्यांनी, तर आरएसपीएमचे प्रमाण ५० टक्क्यांनी कमी झाले आहे. एसओटू, एनओटू आणि आरएसपीएमचे प्रमाण हे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनापेक्षा ५० टक्क्यांनी कमी झाल्याचे दर्शवत आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांच्या नेतृत्वाखाली संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, फिल्ड असिस्टंट अजय गौड आणि अमित माने यांनी प्रदूषण मापनाचे काम केले.

**लॉकडाऊनमधील हवेतील प्रदूषकांचे प्रमाण**

| ठिकाण | महिना | एसओटू | एनओटू | आरएसपीएम |
|---|---|---|---|---|
| दाभोळकर कॉर्नर | मार्च (दि. १६ ते २२) | २६.१९ | ४५.१५ | १२८.४७ |
| | एप्रिल (दि. ६ ते १२) | १८.४५ | ३०.८२ | ७४.६५ |
| महाद्वार रोड | मार्च (दि. १६ ते २२) | २०.५९ | ३७.५१ | ९८.९६ |
| | एप्रिल (दि. १६ ते २२) | १३.६१ | २५.५४ | ५३.८२ |
| शिवाजी विद्यापीठ | मार्च (दि. १६ ते २२) | १२.१५ | १७.५४ | ५७.९९ |
| | एप्रिल (दि. १६ ते २२) | ७.१३ | १२.७२ | ४२.३६ |

**पाहणीचा काळ :**
**१६ ते २२ मार्च**
**६ ते १२ एप्रिल**

**पाहणी झालेला परिसर**

महाद्वार रोड, शिवाजी विद्यापीठ परिसर, दाभोळकर कॉर्नर, सीबीएस

> संचारबंदी काळात कोल्हापुरातील हवा प्रदूषणाचा टक्का समाधानकारक घटला आहे. प्रदूषणाचा घटलेला टक्का पाहता भविष्यात वाहनांचे प्रमाण आणि त्यांचा अनावश्यक वापर यावर नियंत्रण आणल्यास कोल्हापूरच्या पर्यावरणाला चांगली दिशा मिळू शकते.
>
> – डॉ. पी. डी. राऊत, पर्यावरण विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ

# उपकुलसचिव पळसे यांच्या नियुक्तीस मान्यता

कोल्हापूर : महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार योग्य त्या प्रक्रिया राबवून शिवाजी विद्यापीठाने सन २०१२ गजानन पळसे यांची उपकुलसचिवपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या नियुक्तीस उच्चशिक्षण कोल्हापूर विभागाचे सहसंचालकांनी मान्यता दिली आहे. येथील राजर्षी शाहू सेनेने उपकुलसचिव पळसे यांच्या नियुक्तीबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर विद्यापीठ प्रशासनाने हा खुलासा केला आहे. राज्यपालांची कोणतीही फसवणूक करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे स्पष्टीकरण विद्यापीठ प्रशासनाने पत्रकाद्वारे दिले आहे.

# यूजीसीची शैक्षणिक धोरण समिती

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

करोनाचा फैलाव रोखण्यासाठी देशभर लागू केलेल्या लॉकडाउनमुळे शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रकही कोलमडले आहे. महाविद्यालये आणि विद्यापीठीय परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. दरवर्षी जून महिन्यात सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षावरही परिणाम जाणवू लागला आहे. या संपूर्ण स्थितीचा विचार करुन विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सध्याच्या परीक्षा आणि नव्या शैक्षणिक वर्षासंदर्भात धोरण ठरविण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमली आहे.

देशभरातील स्थिती, विद्यापीठाच्या अडचणी व सूचना विचारात घेऊन समिती अहवाल तयार करणार आहे. यूजीसीची समिती आणि राज्य सरकारने नेमलेल्या समितीकडून काय शिफारशी होतात आणि अंतिम धोरण काय ठरतेय, याकडे विद्यापीठांचे लक्ष लागून राहीले आहे. यूजीसीने यापूर्वी संशोधक विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी एमफिल व पीएचडी संदर्भात देशभरातील विद्यापीठांना सूचना केल्या आहेत. त्या पाठोपाठ आता सात सदस्यीय समितीची स्थापना झाल्यामुळे या आठवड्यात परीक्षेबाबत निर्णय होऊ शकेल, अशी शक्यता कॉलेज व विद्यापीठ वर्तुळातून व्यक्त होत आहे.

**समितीकडून परीक्षांबाबतही धोरण ठरणार**

यूजीसीच्या सात सदस्यीय समितीमध्ये देशभरातील विविध विद्यापीठांतील पाच कुलगुरू, शिक्षणक्षेत्राशी निगडीत संस्थेतील एक तज्ज्ञ, यूजीसीमधील सहसचिव दर्जाच्या दोघा अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

या साऱ्या पार्श्वभूमीवर यूजीसीने सात सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. समितीच्या चेअरमनपदी हरियाणा केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. आर. सी. कुहाड, सदस्यपदी बनस्थळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. आदित्य शास्त्री, पंजाब युनिव्हर्सिटी चंदीगडचे कुलगुरू प्रो. राज कुमार, इंदोर विद्यापीठाचे प्रो. उपिंदर धार, नवी दिल्ली येथील प्रो. ए. सी. पांडेय, यूजीसीचे सहसचिव सुरिंदर सिंग, विकास गुप्ता यांचा समावेश आहे.

**एमफिल, पीएचडीची मौखिक परीक्षा ऑनलाइन**

करोनाने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे एमफिल व पीएचडीची मौखिक परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याच्या सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने केल्या आहेत. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी देशभरातील सर्व विद्यापीठासाठी ही सूचना लागू केली आहे. यूजीसीने विद्यापीठांना पाठविलेल्या पत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रबंध जमा केल्यानंतर सहा महिन्याच्या आत सर्व प्रक्रिया पूर्ण करुन पदवी देण्याची व्यवस्था करावी, असेही म्हटले आहे.

# विद्यापीठातील कक्षाची प्रशासनाकडून पाहणी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील कोरोना आयसोलेशन कक्षाची सोमवारी जिल्हा प्रशासनाकडून पाहणी करण्यात आली. पाण्याची व्यवस्था, स्वच्छतेची दक्षता व उपचार करण्यासाठी आवश्यक वैद्यकीय उपकरणे यांची उपलब्धता याबाबत चर्चा झाली. आपत्कालीन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासमवेत चर्चा केली.

# महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** क्रांतिसूर्य महात्मा जोजिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

# महात्मा फुलेंना अभिवादन

कोल्हापूर : क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात महात्मा फुले यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. सकाळी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

# आयसोलेशन कक्षाची प्रशासनाकडून पाहणी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

करोनाच्या संशयित रुग्णांमध्ये वाढ होत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा प्रशासनाने शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील वसतीगृह आयसोलेशन कक्ष म्हणून तयार ठेवण्याच्या सुचना केल्या होत्या. त्यानुसार गेल्या तीन दिवसांपासून या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे साहित्य स्थलांतरित करण्यात आले आहे. सोमवारी आयसोलेशन कक्ष म्हणून रूपांतर केलेल्या वसतिगृहाची पाहणी जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाच्या वसतिगृहमध्ये सध्या १००० बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. भविष्यामध्ये करोनाचे संशयित रुग्ण वाढल्यास त्यांच्यावर उपचार करण्यासाठी या विलगीकरण कक्षाचा उपयोग करण्यात येणार आहे. सद्यस्थितीमध्ये कक्ष तयार ठेवावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने काही वैद्यकीय तसेच सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विद्यापीठ प्रशासनाला सूचना केल्या आहेत.

सध्या या वसतिगृहामध्ये बारा विद्यार्थी राहत होते, त्यांना विद्यापीठाच्या अन्य वसतिगृहांमध्ये सुरक्षित ठेवण्यात आले आहे. सध्या आपापल्या गावी केलेल्या विद्यार्थ्यांचे साहित्य या वसतिगृहांमध्ये खोल्यांमध्ये होते ,त्या विद्यार्थ्यांचे साहित्य स्थलांतरित करून सुरक्षित ठेवण्यात आले आहे.



सोमवारी सकाळी अकरा वाजता जिल्हा प्रशासनाच्या वतीने या कक्षाची पाहणी करण्यात आली. या ठिकाणी असलेली पाण्याची व्यवस्था, स्वच्छतेची दक्षता तसेच उपचार करण्यासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय उपकरणे यांची उपलब्धता करून देण्यासाठी चर्चा करण्यात आली.